# चंद्राची सफर

*जयंत नारळीकर*
*१९३८*
*खगोलशास्त्रज्ञ, लेखक.*
*✍ कथा, कादंबऱ्या, वृत्तपत्रे व नियतकालिकांसाठी लेख.*
*मराठीत विज्ञानविषयक लेखन करणाऱ्यांमध्ये प्रमुख स्थान.*

ही कथा घडते एकविसाव्या शतकाच्या मध्यावर कधीतरी.

आलोक नाईक हा त्याच्या आईबाबांचा दत्तक मुलगा. सर्वांना बुचकळ्यात टाकण्याइतक्या विलक्षण बुद्धिमत्तेचा आलोक वयाच्या नवव्या वर्षीच एका आंतरराष्ट्रीय गुणवत्ता चाचणीमध्ये उत्तीर्ण झाला. उत्तीर्ण झालेल्या सर्व मुलांना बक्षीस म्हणून चंद्राची सफर करण्याची संधी मिळाली –

''इंटरनॅशनल शट्लवेजतर्फे आमच्या छोट्या प्रवाशांचं स्वागत असो.''

स्पेस-शटलचा* कॅप्टन बोलत होता. शटलमध्ये दहा मुले व त्यांच्याबरोबर पाच शिक्षक व निरीक्षक एवढेच प्रवासी होते. प्रत्येकाने खास गणवेश चढवला होता व खुर्चीला पट्ट्यांनी नीट बांधून घेतले होते. खुर्चीशेजारच्या टी. व्ही.वर प्रत्येक प्रवाशाला वेगवेगळी दृश्ये दिसू शकत. शटलचालकाचे लहानसे कॅबिन दिसे किंवा ज्या रॉकेट बेसवरून* ते शटल वर जाणार होते त्याची दृश्ये दिसत! आकाशात गेल्यावर तारकांचे किंवा पृथ्वीचे दर्शन त्याच पडद्यावर घडे. जिथे जायचे आहे ते अंतराळातले स्थान जवळ येताना त्याचे बारकाईने निरीक्षण करता येई.

कॅप्टन पुढे बोलत होता, ''मी कॅप्टन गोम्स. शटलवरचा माझा सहकारी बॉब जॉन्सन. तुमची सरबराई* करणाऱ्या सीता, ज्यूडिथ आणि मारिया... पट्टे नीट बांधलेत ना? आता लिफ्ट-ऑफची* वेळ जवळ आली. तुमच्या टी. व्ही. वर कमी कमी होणाऱ्या संख्या पहा. शून्यावर येताच रॉकेट आपल्याला वर उचलील. तुम्ही अर्ध्या तासापूर्वी जी गोळी घेतलीत त्यामुळं तुम्हांला एकदम वर जाताना फारसा त्रास होणार नाही. पण किंचित विचित्र वाटेल हे नक्की. तुम्ही हुशार आहात तसे शूरही आहात; तेव्हा घाबरू नका. शांत पडून रहा. दोन मिनिटांनी सर्व काही परत नॉर्मल होईल. मग मी तुम्हांला पुढल्या प्रवासाबद्दल सांगेन. तूर्त गुड बाय!''

आलोकला कसलीच भीती वाटली नाही. तो फार उत्सुकतेने लिफ्ट-ऑफची वाट पाहत होता. पण त्याने सहज शेजारी वळून पाहिले तर त्याच्याजवळ बसलेल्या मुलीच्या डोळ्यांत त्याला भीती दिसली.

''घाबरलीस का सँड्रा?'' त्याने हळूच विचारले.

''कबूल करायला लाज वाटते; पण होय! मला भीती वाटतेय.'' ती मुलगी 'पॅनिक'*च्या स्थितीत जाण्याची शक्यता आहे, तिचे मन दुसरीकडे वळवले पाहिजे, हे आलोकने ओळखले.

''आपल्याला प्रशिक्षण दिलं तेव्हा कसं गरागरा फिरवलं? त्यापेक्षा हे कमी त्रासाचं आहे. आपल्याला थोडा वेळ वजन वाढल्यासारखं वाटेल. तुला माहीत आहे– मी एकदा एका फनफेअरमध्ये गेलो होतो आईबाबांबरोबर. अशीच कुठली तरी 'राईड'

**स्पेस-शटल**- अवकाशयान
**रॉकेट बेस**- रॉकेटचा तळ
**सरबराई**- पाहुणचार
**लिफ्ट-ऑफ**- उड्डाण
**पॅनिक**- घबराट

होती. बाबा म्हणाले, 'तू घाबरशील, आईबरोबर जा.' तर गंमत म्हणजे आईच घाबरली! मी तिचा हात पकडायच्याऐवजी तिनंच माझा हात धरून ठेवला!''

''आलोक... मी तुझा हात धरला तर चालेल?''

आलोकने आपला हात पुढे केला. सँड्राने तो आपल्या हातात धरून ठेवला.

आलोक व सँड्रा यांना घेऊन जाणारे शटल भारतातील श्रीहरिकोटा शटलपोर्टवरून सुटले होते आणि ते स्पेस-स्टेशन१ कडे निघाले होते. कॅप्टन गोम्सने सांगितल्याप्रमाणे लिफ्ट-ऑफनंतर दोन मिनिटांनी आतल्या प्रवाशांना पुष्कळ आराम वाटू लागला.

''थँक यू, आलोक!'' आलोकचा हात सोडत सँड्रा म्हणाली.

''यू आर वेलकम,'' आलोकने एखाद्या प्रौढ माणसासारखे गंभीरपणे प्रत्युत्तर केले. इतक्यात गोम्सचा चेहरा टी. व्ही. स्क्रीनवर दिसायला लागला व त्याचे शब्द प्रवाशांच्या कानावर पडले.

''पृथ्वीपासून स्पेस-स्टेशन१ पर्यंतचा प्रवास एक तास दहा मिनिटांचा आहे. लवकरच तुम्हांला आपलं वजन कमी होत चाललंय याची जाणीव होईल. कृपा करून खुर्चीचे पट्टे सोडू नका. तुम्हांला काही खावंसं वाटलं तर खुर्चीच्या हातावरचं बटन दाबा. तिथला कप्पा उघडेल आणि त्यात गोळ्या दिसतील... स्पेस-स्टेशनवर डॉकिंग* झाल्यावरसुद्धा मी सांगेपर्यंत खुर्चीवरून हलायचं नाही. आता खास मुलांसाठी टी. व्ही.वर बॅटमॅनची एक फिल्म दाखवण्यात येईल.''


आलोकने टी.व्ही.कडे पाहिले. बॅटमॅनची फिल्म सुरू झाली होती. गॉथम सिटीवर कसले तरी संकट आले होते. त्यामागे होता खलनायक 'जोकर.' आलोकने टी.व्ही. बंद केला. फिल्म न पाहताही ती कशी असेल ते त्याला माहीत होते; आपल्या शहराला वाचवायला बॅटमॅन येणार. भोळेपणाने जोकरच्या सापळ्यात अडकणार, त्यातून सुटणार आणि शेवटी जोकरचा कट हाणून पाडणार... त्याने सँड्राकडे पाहिले. ती मात्र गोष्टीत रंगली होती.

आलोक चॅनल बदलून टी.व्ही. वर बाहेरचे काय दिसते ते पाहत होता. आता पृथ्वीच्या वायुमंडलावर* शटल गेले असल्याने बाहेरचे आकाश काळसर झाले होते. सूर्य यानाच्या मागल्या बाजूला होता. पृथ्वी तर आता दिसेनाशी झाली होती. निळ्या आकाशाखाली बागडणाऱ्या आणि सूर्यप्रकाशावर पोसलेल्या मनुष्यप्राण्याला हा सर्व परिसर कृत्रिम वाटणार. अंतराळात वस्ती करणाऱ्याला पुष्कळ मानसिक आणि शारीरिक तडजोडी कराव्या लागणार... पण आलोकला हे शांत आणि अफाट अंतराळ फार आवडले.

**डॉकिंग**- आपल्या जागेवर जाऊन स्थिर होणे
**वायुमंडल**- पृथ्वीभोवतीचे वातावरणाचे आवरण

हळूहळू स्पेस-स्टेशन१ टी. व्ही. स्क्रीनवर दिसू लागले. ते एखाद्या गोल चकतीप्रमाणे होते. पण त्यात खोल्या, यंत्रे, प्राणवायू तयार करायची सोय, शटल किंवा अंतराळयाने सोडायला खास जागा, त्यांची दुरुस्ती करावी लागली तर त्यासाठी वर्कशॉप – सर्व काही होते. ह्या प्रवासावर निघण्यापूर्वी मुलांना जी माहिती पुरवण्यात आली होती तिच्यात स्पेस-स्टेशन१ची रचना पण समाविष्ट केलेली* होती.

"मुलांनो, आता आपला प्रवास संपत आला." कॅप्टन गोम्सने घोषणा केली. "स्पेस-स्टेशनचे कर्मचारी येऊन तुम्हांला हातानं धरून आत नेतील. शून्य गुरुत्वाकर्षणात राहण्याचा हा तुमचा पहिला अनुभव. तुम्हांला मजा वाटेल, पण फार उड्याबिड्या मारू नका. उद्या तुम्हांला अंतराळयानातून चंद्रावर नेऊन आणण्यात येईल आणि मग परत पृथ्वीवर याच शटलनं तुम्हांला पोचवण्यात येईल. मात्र त्या वेळी मी इथं नसेन. माझे मित्र कॅप्टन मेहरा शटल चालवतील. तेव्हा मी आता तुमचा निरोप घेतो."



*कृष्णा रेड्डी • अनामिक • मुद्राचित्र*

डॉकिंग झाल्यावर मुले सावकाश पावले टाकीत बाहेर आली. स्पेस स्टेशनच्या आतल्या भागाकडे पाहून आपण अंतराळात आहोत असे वाटले नसते. परंतु गुरुत्वाकर्षण नसल्याचे शरीराला जाणवत होते.

**समाविष्ट करणे**- सामील करणे

निघण्यापूर्वी पृथ्वीवर मुलांना एक जुना चित्रपट गंमत म्हणून दाखविला होता.

त्याचे नाव : २००१ ए स्पेस ओडिसी. आर्थर क्लार्कच्या विज्ञानकथेवर आधारलेल्या या चित्रपटात पुष्कळ गमतीची दृश्ये होती. ती दृश्ये त्यांना आता प्रत्यक्ष अनुभवायला मिळणार होती. भिंतीवरून व छतावरून आडवेतिडवे चालणे, अन्न घशाखाली उतरवायला करावी लागणारी कसरत, फ्लशऐवजी हवेने घाण ओढून घेणारे संडास, वजन नसलेली मोठाली धुडे सहजगत्या हलवता येणे... मुलांना ही पर्वणीच होती. मुले इथे कशी वागतात इकडे त्यांच्याबरोबरच्या निरीक्षकांचे लक्ष होते. मुलांनी प्रश्न विचारले तर त्यांची उत्तरे ते देत होते.

इतर मुले हसतखिदळत होती, तर आलोक शांत होता. विचारमग्न होता.

''काय आलोक, तुला प्रवास कंटाळवाणा तर नाही वाटत?'' एका निरीक्षक बाईने विचारले.

''मुळीच नाही, डोरोथी! गंमत वाटते हे सर्व पाहून.''

पण डोरोथी फील्डचे समाधान झाले नाही. तिने आलोकला विचारले, ''पण तू काही या मुलांच्या खेळात भाग घेत नाहीस! हे अनुभव तुला एरव्ही कधी घेता येणार नाहीत.''

''कबूल! पण मला त्यात फारसं नावीन्य वाटत नाही.'' भिंतीवरून थोडेसे चालत आलोक पुढे म्हणाला, ''खरं म्हणजे वाटायला पाहिजे; पण नाही! सारखे माझ्या मनात हेच विचार येत आहेत की असल्या परिसरात राहायचा हा अनुभव मी प्रथमच घेत असूनसुद्धा मला त्यात काही विलक्षण का भासत नाही?''

डोरोथीकडे या प्रश्नाचे उत्तर नव्हते.

चंद्रावर जाणाऱ्या या यानाचे नाव होते 'शशांक.' जागतिक अंतराळ संस्थेने चंद्रावर जाणाऱ्या यानांचा नमुना तयार केला तेव्हाच असे ठरवण्यात आले होते की, या नमुन्याप्रमाणे बनवलेल्या यानांना वेगवेगळ्या देशांतर्फे नावे देण्यात यावी, पण ते नाव चंद्राचे असावे. भारतातर्फे 'शशांक' असे नाव सुचवण्यात आले होते.

स्पेस-स्टेशन१ पासून चंद्रापर्यंत पोचायला शशांकला अठ्ठावीस तास लागले. चंद्रावर पहिल्यांदा मानवाने पदार्पण केले, त्यापेक्षा हा वेळ निम्म्याहून कमी होता. अखेर शशांक चंद्रावर उतरायच्या तयारीला लागले.


''सँड्रा, तुला एक गणित घालू?'' सँड्राची अस्वस्थता घालवण्याकरता आलोक म्हणाला.

''घाल.''

''स्पेस-स्टेशन१ पासून चंद्रापर्यंत यायला प्रकाशाला सव्वा सेकंद लागतो.

आपल्या यानाला अठ्ठावीस तास लागले. हेच यान जर याच वेगानं सगळ्यांत जवळच्या ताऱ्याकडे गेलं तर त्याला किती वेळ लागेल? हे यान उतरायच्या आत तुझं उत्तर बरोबर आलं तर जिंकलीस.''

सँड्राला माहीत होते की सगळ्यांत जवळचा तारा सव्वाचार प्रकाशवर्षे अंतरावर आहे. म्हणजे प्रकाशाला तिकडे पोचायला सव्वाचार वर्षे लागतात. तिने त्रैराशिक मांडले. मनातल्या मनात सोडवले आणि उत्तर दिले, ''तीन लाख त्रेचाळीस हजार वर्षे अंदाजे.''



*बाबूराव सडवेलकर • 'हिरण्यगर्भ' • तैलरंग*

''हे घे बक्षीस.'' आलोकने सँड्राचे आवडते पेपरमिंट तिला दिले. मात्र का कोण जाणे, तो मनातल्या मनात अस्वस्थ झाला.

o

''काय आलोक, काय आणलंस माझ्याकरता चंद्रावरून?'' मालिनीने त्याला जवळ घेत विचारले.

"आई, तुला हिरे, मोती आवडतात; पण ते चंद्रावर नव्हते. दगड न् धोंडे पुष्कळ होते. त्यांतले हे तुझ्यासाठी आणले."

चंद्रावरील सूव्हनीर* विकणाऱ्या दुकानातून आणलेला एक ताईत आणि आंगठी हे दोन अलंकार आलोकने मालिनीला दिले. दोन्हीमध्ये चंद्रातले खडे बसवले होते. मालिनी खूष झाली. तिच्या महिलामंडळात आता तिचा भाव बराच वाढणार होता.

"आणि माझ्यासाठी काय आणलंस?" सुधाकरने गमतीने विचारले. वास्तविक आलोक सुखरूप परत आला यातच त्याला समाधान होते.

आलोकने एक पांढरा टी-शर्ट काढून दिला. त्यावर एका संस्कृत सुभाषिताची दुसरी ओळ लिहिलेली होती :

एकः चंद्रः तमो हन्ति, न तु तारागणशतम्।*

चंद्राची माहिती सांगणारे हे सुभाषित टूरिझमसाठी वापरण्यात आले याबद्दल सुधाकरला कौतुक वाटले. पण सुभाषिताची पहिली ओळ आलोकने सार्थ केली असे त्याने मनोमन म्हटले.

—जयंत नारळीकर

सूव्हनीर- एखाद्या ठिकाणची आठवण करून देणारी वस्तू

एकः चंद्रः ...- शंभर तारे काळोख दूर करू शकत नाहीत, परंतु एक चंद्र ते करू शकतो.